**महाराष्ट्र शासन - सार्वजनिक आरोग्य विभाग**
**राज्य आरोग्य माहिती व जीवनविषयक आकडेवारी कार्यालय,**
डॉ. नायडू सांसर्गिक रुग्णालय आवार, केनेडी रोड, पुणे -४११ ००१

| | |
|---|---|
| उपसंचालक आरोग्य सेवा (आमाजिआ) तथा उपमुख्य निबंधक (जन्म व मृत्यू) महाराष्ट्र राज्य | कार्यालय ☎ :- ०२० - २६०५९५३०<br>मा.सं. विभाग ☎ :- ०२० - २६०५८६१०<br>फॅक्स क्र. :- ०२० - २६०५८२९२<br>ई-मेल crs_d83@yahoo.com |

**परिपत्रक क्रं. ३** क्र.आमाजिआ/कक्ष-८ ३/उपजत मृत्युचे अभिलेख/ 9081-953 /१६
दिनांक:- 1 /8 /२०१६

प्रति,

१) जिल्हा आरोग्य अधिकारी तथा जिल्हा निबंधक जन्म-मृत्यु
जिल्हा परिषद ........... (सर्व)

२) आरोग्य अधिकारी तथा निबंधक जन्म-मृत्यु
महानगरपालिका ............ (सर्व)

३) कार्यकारी आरोग्य अधिकारी तथा निबंधक जन्म-मृत्यु,
बृहन्मुंबई महानगरपालिका, परेल, मुंबई.

विषय :- **जन्म-मृत्यू व मृत जन्माचे (उपजत मृत्यू) चे अभिलेख कायम स्वरुपी जतन करुन ठेवणेबाबत.**

संदर्भ :- आंतर विभागीय समन्वय समिती सभा दिनांक २६/११/२०१५ मधील निर्णय.

राज्यात जन्म-मृत्यू नोंदणी केंद्र शासनसाने जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ व महाराष्ट्र जन्म-मृत्यू नोंदणी नियम २००० अन्वये ग्रामीण व शहरी भागात नोंदणी केली जाते. राज्याच्या ग्रामीण व शहरी भागात मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या आंतर विभागीय समन्वय समितीच्या बैठकीत जन्म-मृत्यू, मृत जन्म (उपजत मृत्यू) अभिलेख हे अधिनियम व नियमातील तरतूदी नुसार संबंधित संस्थेकडे ठेवणे बाबत चर्चा होऊन विषयक क्रं.७ अन्वये अधिनियम व नियमातील तरतुदी नुसार संबंधीत संस्थेकडे अभिलेख कायम स्वरुपी ठेवणे बाबत निर्णय झाला आहे.

जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ व महाराष्ट्र जन्म-मृत्यू नोंदणी नियम २००० मध्ये खालील तरतूद करण्यात आलेली आहे.

**नियम १७ - कलम (२)(फ) खालील नोंदवहया व इतर अभिलेख.**

१) जन्म-मृत्यू व मृत जन्माच्या (उपजत मृत्यू) नोंदवहया हे कायम स्वरुपी महत्वाचे अभिलेख असतील व ते नष्ट करण्यात येऊ नये.

२) निबंधकास विलंबित नोंदणीची परवानगी देणारे न्यायालयीन आदेश आणि या बाबतीत विनिर्दिष्ट केलेले प्राधीकारी यांचे कलम १३ अनुसार मिळालेले आदेश हे जन्म नोंदवही, मृत्यू नोंदवही व मृत जन्माच्या (उपजत मृत्यू) नोंदवहीचे अविभाज्य भाग समजले जावेत व ते नष्ट करण्यात येऊ नयेत.

४) प्रत्येक नोंदवही आणि वर्ष अखेरीस त्यातील नोंदी संबंधीचे नमुने ते ज्या कॅलेंडर वर्षाशी संबंधित आहेत. त्यानंतर ६ वर्षा पर्यंत जन्माची नोंदवही व १ वर्षापर्यंत मृत्यूची/मृत जन्माची (उपजत मृत्यू) नोंदवही, निबंधक स्वतःच्या ताब्यामध्ये ठेवील आणि त्यानंतर अशा नोंदवहया व नमुने सुरक्षित अभिरक्षेसाठी ग्रामीण भागासाठी गटविकास अधिकारी यांचेकडे सुपूर्द करेल. शहरी भागातील संबंधीत निबंधक, जन्म-मृत्यू व मृत जन्माचे (उपजत मृत्यू) अभिलेख कायम स्वरुपी जतन करण्याची जबाबदारी त्यांचे पातळीवर करतील.

आजही ब-याच ग्राम पंचायतीकडे त्यांचे स्तरावर व जन्म-मृत्यू व मृत जन्म (उपजत मृत्यू) चे जुने अभिलेख ठेवले असल्याचे दिसून आले आहे. वास्तविक मागील वर्षाचे जुने अभिलेख ६ वर्षानंतर जन्माचे व १ वर्षानंतर मृत्यूचे व मृत जन्म (उपजत मृत्यूचे) अभिलेख गटविकास अधिकारी यांचे स्तरावर जमा करुन सुरक्षित ठेवावे अशा सूचना यापूर्वी आपणास निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. तथापी गटविकास अधिकारी यांचेकडे मागील वर्षाचे अभिलेख जमा झालेले नाहीत. यास्तव सर्व गटविकास अधिका-यांना सन १९६९ नंतरचे ग्रामपंचायत स्तरावरील अभिलेख मागवून वर्षनिहाय सुरक्षित ठेवणेबाबत आदेशित करावे.

जर एखादया गटविकास अधिकारी यांचे स्तरावर जागेची अडचण असल्यास याबाबत पर्यायी व्यवस्था करणे विषयी आदेशित करावे. अभिलेखाचे जतन व्यवस्थीतरित्या न केल्यास अथवा उपलब्ध होत नसल्यास नागरीकांना दाखला मिळण्यास अडचणी येतात व काही घटनांसाठी प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी यांचे आदेश प्राप्त करुन घ्यावे लागतात. तसेच त्यांना आर्थिक व मानसिक अडचणींना तोंड दयावे लागते. ही बाब लक्षात घेऊन व याबाबतचे गांर्भिय लक्षात घेऊन आपले स्तरावरुन आपल्या कार्यक्षेत्रातील गटविकास अधिकारी यांना आदेश निर्गमित करुन तसे या कार्यालयास अवगत करावे.

उपसंचालक आरोग्य सेवा (आमाजीआ)
तथा उपमुख्य निबंधक जन्म-मृत्यु
महाराष्ट्र राज्य पुणे-१

प्रत सादर -
मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
मा. संचालक, आरोग्य सेवा तथा मुख्य निबंधक जन्म-मृत्यु, महाराष्ट्र राज्य, मुंबई-१.

प्रत सस्नेह -
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ....... (सर्व)
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) तथा अप्पर जिल्हा निबंधक, जिल्हा परिषद, ... (सर्व)
प्रत - गटविकास अधिकारी तथा अप्पर जिल्हा निबंधक, जन्म-मृत्यू, पंचायत समिती, ...... (सर्व)